महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.

## श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम, उस्मानाबाद

दूरध्वनी क्र.(०२४७२-२२१८१८) ई-मेल:- distsports.osmanabad@gmail.com

क्र.जिक्रीअ/मराक्रीधो/२०१९-२०/का-३/ दिनांक : १८/०७/२०१९

प्रति,

मा. जिल्हा क्रीडा अधिकारी,

-------------------------

विषय :-महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण - २०१२

खो-खो खेळाचे राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजनबाबत...

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. शिक्रीपी/राक्रीप्रशि/पुम/२०१८-१९/का-१३/५५/दि.२७ ऑगस्ट,२०१८

महोदय,

राज्यात क्रीडा संस्कृतिचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन अनेक वर्षापासून प्रयत्नशील आहे. राज्यातील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करून पदक विजेते खेळाडू तयार व्हावेत यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाडूंच्या दर्जात सुधारणा, दर्जेदार पायाभुत सुविधा, खेळाडूंचा गौरव, क्रीडा प्रशिक्षकांना अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख या बाबी विचारात घेवून राज्याचे क्रीडा धोरण -२०१२ तयार करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भीय पत्रान्वये राज्यातील प्राविण्यधारक खेळाडूंना उत्कृष्ट दर्जाचे प्रशिक्षण देण्याकरिता खो-खो या खेळाच्या प्रशिक्षण शिबीराच्या आयोजनाची जवाबदारी उस्मानाबाद जिल्हयाकडे सोपविण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने राज्यस्तर खो-खो क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन २०१८-१९

| | | |
|---|---|---|
| १ | शिबीर कालावधी | दिनांक २८ जुलै ते ११ ऑगस्ट २०१९ |
| २ | वयोगट | १७ व १९ वर्षाखालील मुले/मुली |
| ३ | उपस्थिती | दिनांक २८ जुलै, २०१९ रोजी सायं. ५.०० वा. पर्यत |
| ४ | प्रशिक्षण शिबीर स्थळ, निवास व भोजन व्यवस्था | श्री. तुळजा भवानी जिल्हा क्रीडा स्टेडियम उस्मानाबाद |
| ५ | प्रशिक्षण शिबीरासाठी उपस्थिती स्थळ | श्री. तुळजा भवानी जिल्हा क्रीडा स्टेडियम उस्मानाबाद |
| ६ | प्रशिक्षण शिबीराकरिता संपर्क | कु. सारिका काळे, ता. क्री.अ., मो.क्र. ७२१८३९०३६७<br>श्री अशोक बनसोडे, क्रीडा अधिकारी ,९४२१३५३५२०<br>डॉ. चंद्रजित जाधव,महाराष्ट्र खो-खो असो. ९४२२०७०१५५ |

उपरोक्त क्रीडा प्रशिक्षण शिबीरासाठी सोबतच्या यादीप्रमाणे आपल्या जिल्हयातील खेळाडूंना सदर प्रशिक्षण शिबिरास उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे , व खेळाडूकडून सदर शिबिरास उपस्थित रहाण्याबाबतची सहमती तसेच सदर खेळाडूची टि शर्ट व ट्रॅक सुट साईज या कार्यालयास दि. २४/०७/२०१९ पर्यंत कळविण्यात यावी अशी विनंती आहे.

आपली विश्वासु

(भाग्यश्री बिले)
जिल्हा क्रीडा अधिकारी,उस्मानाबाद

प्रतमाहितीस्तव सविनय सादर
मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे
मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर

Scanned by CamScanner